# कोकणातील दुर्गम भागात आरोग्य उपकेंद्र वाढवण्याची गरज

## डॉ. म. ह. परांजपे- आरोग्य शिबिरात उघड झाले वास्तव

पुणे : प्रतिनिधी

कोकणात काही भाग दुर्गम असून तेथील नागरिकांना प्राथमिक उपचारदेखील मिळत नाहीत. त्यांना उपचार मिळण्यासाठी शासनाने आणखी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र स्थापना करायला हवीत, अशी सूचना आयुर्वेद शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. म. ह. परांजपे यांनी केली आहे.

आयुर्वेद शिक्षण मंडळाच्या अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने १८ ते २४ डिसेंबर २०१९ दरम्यान रत्नागिरी जिल्ह्यातील दुर्गम भागांमध्ये ११ ठिकाणी मोफत सर्व रोग निदान चिकित्सा शिबिरे घेण्यात आली. यामध्ये त्यांनी सुमारे १५ हजार लहान- मोठ्या नागरिकांची आरोग्य तपासणी केली. त्याचे निष्कर्ष आणि उपाययोजना याबाबतची माहिती डॉ. परांजपे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी आयुर्वेद शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील बहिरट, अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भीम गायकवाड व इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ. परांजपे म्हणाले, रत्नागिरी जिल्ह्यातील दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा देण्याच्या

> “ किरकोळ आजारांपासून गंभीर आजारापर्यंच्या सर्व आजारांवरील उपचारांसाठी रुग्णांना तीस ते चाळीस किलोमीटर अंतरावर जावे लागते. गंभीर आजारांच्या रुग्णांना जास्त चांगल्या आधुनिक उपचारांसाठी पुणे- मुंबई किंवा तत्सम शहरात येणे परवडत नाही तर याकरिता जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. तसेच सुसज्ज प्रसूतीगृह आणि तज्ज्ञ डॉक्टर्स यांचीही तिथे आवश्यकता आहे.
>
> **डॉ. म. ह परांजपे,**
> सचिव, आयुर्वेद शिक्षण मंडळ

शिबिराचे हे २८ वे वर्ष आहे. या शिबिरात आडिवरे, भाटये, कशेळी, गोळप, पावस, कुर्धे, मेर्वी, कोणसर बुद्रुक, गावडे आंबेरे, नेवरे अशा गावांमध्ये शिबिरे घेण्यात आली. अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय यांचे २० डॉक्टरांचे पथक या शिबिरासाठी पुण्याहून नेण्यात आले होते. या पथकाने दिवसभरात दररोज किमान ४०० ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करून त्यांच्यावर मोफत औषधोपचार केले.

### हे आढळले आजार

आरोग्य तपासणीत कुपोषित मुले, मोतिबिंदू, पोटाचे विकार आणि त्वचेचे रोग यांचे प्रमाण अधिक आढळले. वयाची चाळिशी उलटलेल्या काही महिलांमध्ये स्तनाच्या आणि गर्भाशयाच्या कर्करोगाची लक्षणे आढळली. त्यातील चारजणींची अधिक तपासणी केली असता त्यांना कर्करोगाचे निदान झाले आहे, तर कुपोषणाची समस्या सर्वच गावांमध्ये दिसून आली.

### कर्करोगाबाबत 'जागृती नाही

स्त्रियांच्या स्तनांचे कर्करोग आणि मोतीबिंदू यावर जनजागृती होण्याची अधिक आवश्यकता आहे. स्तनात गाठ आल्यावर तपासणी करून घ्यावी, त्यावर उपचार करून घ्यावेत याविषयी महिला अनभिज्ञ होत्या. तीच स्थिती मोतीबिंदूबाबत होती. तर शुद्ध पाण्याअभावी येथे पोटाच्या विकारांचे रुग्ण खूप आढळले. पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळणेही तिथे अवघड असल्याचे जाणवले.

Scanned by CamScanner

पुण्य नगरी

8 रविवार, १९ जानेवारी २०२० | पुणे

# कोकणातील दुर्गम भागात आरोग्य उपकेंद्रे हवीत

## डॉ. म. ह. परांजपे यांचे मत

। पुणे । प्रतिनिधी

कोकणातील दुर्गम भागात आरोग्य सेवा पुरविण्यासाठी तेथील ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे हवीत, अशी सूचना आयुर्वेद शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. म. ह. परांजपे यांनी केली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील दुर्गम भागांमध्ये ११ ठिकाणी आयुर्वेद शिक्षण मंडळाच्या अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने दि. १८ ते २४ डिसेंबर २०१९ दरम्यान मोफत सर्वरोगनिदान चिकित्सा शिबिरे घेण्यात आली. त्याचे निष्कर्ष आणि उपाययोजना याची माहिती डॉ. परांजपे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रत्नागिरी जिल्ह्यातील आडिवरे, भाट्ये, कशेळी, गोळप, पावस, कुर्धे, मेर्वी, कोणसर बुद्रुक, गावडे आंबेरे, नेवरे अशा गावांमध्ये शिबिरे घेण्यात आली. अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय यांचे २० डॉक्टरांचे पथक या शिबिरासाठी पुण्याहून नेण्यात आले होते. या पथकाने दिवसभरात दररोज किमान ४०० ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करून त्यांच्यावर औषधोपचार केले. याकरिता चार लाख रुपयांची औषधे उपलब्ध करण्यात आली होती. ही औषधे, कुपोषित मुलांसाठी रक्तवर्धक औषधे व चष्म्यांचे मोफत वाटप शिबिरात करण्यात आले.

आरोग्य तपासणीत पोटाचे विकार आणि त्वचेचे रोग यांचे प्रमाण अधिक आढळले. मोतिबिंदूचे रुग्णही जास्त आढळले. वयाची चाळिशी उलटलेल्या काही महिलांमध्ये स्तनाच्या आणि गर्भाशयाच्या कर्करोगाची लक्षणे आढळली. त्यातील चारजणींची अधिक तपासणी केली असता कर्करोगाचे निदान झाले आहे. कुपोषणाची समस्या सर्वच गावांमध्ये दिसून आली.

स्तनात गाठ आल्यावर तपासणी करून घ्यावी, त्यावर उपचार करून घ्यावेत, याविषयी महिला अनभिज्ञ होत्या. तीच स्थिती मोतिबिंदूबाबत होती. या आजारांवर जुजबी उपचार केले जात होते, असे रुग्णांशी बोलताना कळले.

किरकोळ आजारांपासून गंभीर आजारापर्यंतच्या सर्व आजारांवरील उपचारांसाठी रुग्णांना तीस ते चाळीस किलोमीटर अंतरावर जावे लागते, असे रुग्णांशी बोलताना समजले. गंभीर आजारांच्या रुग्णांना जास्त चांगल्या आधुनिक उपचारांसाठी पुणे, मुंबई किंवा तत्सम शहरात येणे परवडत नाही. याकरिता जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या वाढविणे गरजेचे आहे, असे डॉ. परांजपे यांनी सांगितले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. भीम गायकवाड उपस्थित होते.

Scanned by CamScanner

पुणे
लोकमत
www.lokmat.com
रविवार
दि. १९ जानेवारी २०२०

# कोकणातील दुर्गम भागात कुपोषणाची समस्या

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोकणातील दुर्गम भागात आरोग्य सुविधांचा अभाव, तसेच जनजागृतीअभावी आजही कुपोषणाची मोठी समस्या आहे. मोतीबिंदूपासून कर्करोगापर्यंत अशा अनेक आजारांबाबत लोक अनभिज्ञ असल्याचे अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाने केलेल्या पाहणीत आढळून आले आहे.

महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने दि. १८ ते २४ डिसेंबर या कालावधीत रत्नागिरी जिल्ह्यातील आडिवरे, भाटये, कशेळी, गोळप, पावस, कुर्धे, मेर्वी, कोणसर बुद्रुक, गावडे आंबेरे, नेवरे या दुर्गम भागातील गावात मोफत रोग निदान चिकित्सा शिबिरे घेण्यात आली. त्याचे निष्कर्ष आणि उपाययोजना याची माहिती आयुर्वेद शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. म. ह. परांजपे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली. महाविद्यालय व रुग्णालयाच्या २० डॉक्टरांचे पथक या शिबिरात सहभागी झाले होते. या पथकाने दिवसभरात दररोज किमान १०० ग्रामस्थांची आरोग्य तपासणी केली. या तपासणीदरम्यान नागरिकांमध्ये विविध आजारांविषयी अनभिज्ञता असल्याचे आढळून आले.

कुपोषणाची समस्या सर्वच गावांमध्ये दिसून आली आहे. किरकोळ आजारांपासून गंभीर आजारापर्यंतच्या सर्व आजारांवरील उपचारांसाठी रुग्णांना ३० ते ४० किलोमीटर अंतरावर जावे लागते. त्यामुळे अनेकदा आजारांकडे दुर्लक्ष केले जाते. आरोग्य तपासणीत पोटाचे विकार आणि त्वचेचे रोग यांचे प्रमाण अधिक आढळून आले आहे. प्रामुख्याने दूषित पाण्यामुळे पोटाचे विकार होत असल्याचे दिसून आले. प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या वाढवून तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्याची गरज असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

Scanned by CamScanner